# संपादकीय

## औद्योगिक व आर्थिक विकासाचा उंचावणारा आलेख

एकीकडे लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना व सर्वच राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्ते यात गुंतले असताना देशाच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकात वाढ झाल्याचे सकारात्मक वृत्त समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मार्च २०२३ च्या तुलनेत मार्च २०२४ या महिन्यासाठी खाणकाम, उत्पादन आणि वीज या तीन क्षेत्रांचा वृद्धी दर अनुक्रमे १.२ टक्के, ५.२ टक्के आणि ८.६ टक्के इतका झाला आहे. तर, मार्च २०२४ मध्ये देशाच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांक ४.९ टक्के इतका झाला आहे. भारतातील देशांतर्गत उत्पादनात झालेली वाढ व निर्यातीत झालेली वाढ यामुळेच हे यश मिळाले आहे. लोकसभा निवडणुकीचा प्रचार जोरात सुरू असतानाच विद्यमान केंद्र सरकारची ही महत्त्वपूर्ण उपलब्धी समोर आली आहे. आघाडीवर हे यश मिळालेले असतानाच दुसरीकडे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमातही मोदी सरकारने उल्लेखनीय यश मिळविले असल्याचे आंतरराष्ट्रीय संस्थांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे. या संदर्भात आंतरराष्ट्रीय थिंक टँक 'ब्रुकिंग्स'चा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. मोदी सरकारच्या विविध योजनांमुळेच देशातील दारिद्र्य कमी झाल्याचा निर्वाळा या संस्थेने आकडेवारीसह दिला.

भारतात गरिबांची संख्या जागतिक बँकेने निर्धारित केलेल्या निकषांपेक्षा अतिशय कमी आहे. दारिद्र्यरेषेखाली असलेल्यांच्या संख्येत मागील ३० वर्षांच्या तुलनेत ११ वर्षांत मोठी घट झाली आहे, असे ब्रुकिंग्सने स्पष्टपणे आपल्या अहवालात नमूद केले आहे. काही दिवसांपूर्वी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचादेखील एक अहवाल प्रकाशित झाला होता. मात्र, सध्या देशात लोकसभा निवडणूक हा एकमेव विषय केंद्रस्थानी असल्याने या अहवालाकडे देशातील जनतेचे तसेच प्रसार माध्यमांचेही म्हणावे तसे लक्ष गेले नव्हते. 'मेक इन इंडिया' अंतर्गत आर्थिक व औद्योगिक आघाडीवर भारताला जास्तीत जास्त स्वावलंबी करण्याच्या केंद्रातील मोदी सरकारच्या प्रयत्नांना आणि निर्धाराला यश येत असल्याचे आयएमएफच्या या अहवालात नमूद करण्यात आले होते. स्वयंरोजगाराला व ग्रामोद्योगांना चालना देणे आणि दुसरीकडे औद्योगिक उत्पादनात सातत्याने कशी वाढ होईल, या दिशेने प्रयत्न करणे, हेच मोदी सरकारचे वैशिष्ट्य राहिले आहे. त्यामुळे पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल करणारा भारत हा सातत्याने औद्योगिक उत्पादन वाढीसाठी तसेच निर्यात वृद्धीसाठी प्रयत्न करीत आहे. स्टार्टअप इंडिया, कौशल्य विकास योजना, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया, व्होकल फॉर लोकल या योजना सरकारच्या दृष्टीने 'गेमचेंजर' ठरल्या. देशातील तरुणाईमध्ये आत्मविश्वास व चैतन्य निर्माण करण्यासाठी या योजनांचे योगदान मोठे राहिले आहे. या योजना केवळ कागदावरच न राहता त्या प्रत्यक्ष व्यावहारिक पातळीवर कशा अंमलात येतील, यावरदेखील केंद्रातील मोदी सरकारने लक्ष केंद्रित केले. गेल्या १० वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवभारताच्या निर्माणासाठी जे अथक प्रयत्न केले, त्याची दृश्य फळे आता दिसू लागली आहेत. प्रत्येक जागतिक व्यासपीठावर भारताची नाममुद्रा ठसवण्यात पंतप्रधानांना यश प्राप्त झाले आहे. भारत ही केवळ विदेशी वस्तूंच्या विक्रीसाठीची बाजारपेठ न राहता उत्पादनाचे केंद्र बनावे, या उद्देशानेच केंद्राने गत १० वर्षांपासून धोरणात्मक पावले टाकली.

## शिष्यवृत्ती परीक्षेत पास झालेल्या विद्यार्थीनीचा सत्कार

**रिसोड:** स्थानिक डॉक्टर अल्लामा इकबाल उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील शिफा मोमीन कलीम खान पठाण या विद्यार्थीनीने महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद पुणेद्वारा घेण्यात आलेली आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तम गुण घेऊन यश संपादन केले याबद्दल तिचा शाळेचे संस्थापक मोहम्मद कबीर मोहसीन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तिने आपल्या यशाचे श्रेय शाळेचे



मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग यांना दिले. या कार्यक्रमाला शाळेचे सचिव डॉक्टर वकार मोहसीन, प्राचार्य जमीर अहमद खान, शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी वर्गाची उपस्थिती होती. (श.प्र.)

### ■ आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्थेचा उपक्रम, आतापर्यंत ३० हजाराची शैक्षणिक मदत

# यावर्डीच्या मंगेश इंगोलेला दहा हजार रुपयाची आर्थिक मदत

**कारंजा तालुका प्रतिनिधि- गरीब होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षनात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथील विद्यार्थी मंगेश लक्ष्मण इंगोले याला आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था वाल्हई तर्फे तीसऱ्यांदा दहा हजार रुपयाचा धनादेश देऊन शैक्षणिक मदत करण्यात आली.**



बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डीचे मुख्याध्यापक विजय भड यांच्या हस्ते मंगेश लक्ष्मण इंगोले व त्यांचे वडील लक्ष्मन इंगोले यांना दिनांक ०९ मे २०२४ रोजी दहा हजार रुपयाचा धनादेश वितरित करण्यात आला.

मंगेश इंगोले हा विद्यार्थी बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय यावर्डी येथे इयत्ता आठवी ते दहावी पर्यंत शिकत होता. त्यानंतर त्याने बारावी पर्यंतचे शिक्षण कारंजा येथे पूर्ण करून त्याचा नंबर ॲग्रीकल्चर कॉलेज तोंडापूर, कळमनुरी जिल्हा हिंगोली येथे बीएससी एग्री करिता लागला.

परंतु घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्याच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्था वाल्हई तर्फे मंगेश लक्ष्मण इंगोले ला बीएससी फर्स्ट इयरला दहा हजार रुपये, बीएससी सेकंड इयरला दहा हजार रुपये आता थर्ड इयर दहा हजार रुपये अशी आता पर्यंत तीस हजार रुपयाची शैक्षणिक मदत करण्यात आली.

मंगेश इंगोले हा होतकरू विद्यार्थी असल्यामुळे मुख्याध्यापक विजय भड यांनी त्याचे नाव वर्ग नववी मध्ये आदिशक्ती महिला बहुउद्देशीय संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी योजने मध्ये दिले,

त्यामुळे मंगेशला इयत्ता नववी पासून तर बारावी पर्यंत विविध शैक्षणिक साहित्य संस्थेतर्फे देण्यात आले. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई पुस्तक पेढी अंतर्गत नववी पासून बारावी पर्यंत पुस्तके दिलेत.

मंगेश इंगोले आता बीएससी ॲग्रीच्या सहाव्या सेमिस्टरला आहे. सदर धनादेश वितरित करत असताना शाळेतील शिक्षक राजेश शेंडेकर, गोपाल काकड, अनिल हजारे यांच्यासह देविदास काळबांडे, भालचंद्र कवाने, राजू लबडे, राजेश लिंगाटे, राजेंद्र उमाळे शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### ■ समता नायक महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त

# रिसोड येथे पर्यावरणपूरक पळसपान पत्रावळी कार्यक्रमाचे आयोजन

**रिसोड वार्ता -सद्धस्थितीत वायु,जल आणि जमीन प्रदुषणाकरिता अनेक नवनिर्मित रासायनिक घटकापैकी प्लॅस्टिक , थर्माकोल तसेच भेसळयुक्त खाद्यपदार्थ हे घटक कारणीभूत आहेत असे म्हणणे वावगे होणार नाही.वर्तमान काळामध्ये कमीत-कमी २० टक्के जनसंख्या कोणत्यातरी एका दुर्धर आजाराने ग्रस्त आहे आणि प्लॅस्टिकचा असाचं सर्रास उपयोग होत राहिला तर हे प्रमाण केव्हा ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडेल हे कळणार सुध्दा नाही असे मत छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार प्राप्त गजानन मुलंगे ह्यांनी आसन गल्ली स्थित जगन्नाथ मुलंगे यांच्या राहत्या घरी समता नायक महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त आयोजित पर्यावरणपूरक पळसपान पत्रावळी कार्यक्रमा दरम्यान व्यक्त केले.**



कार्यक्रमाकरिता अविनाश सहातोंडे अध्यक्ष रिसोड तालुका वकिल संघटना,दिनकर कानडे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळ तालुका रिसोड,विष्णु जटाळे वनपाल सामाजिक वनीकरण विभाग परिक्षेत्र रिसोड,अरूण पडवे मंडळ अधिकारी तहसिल कार्यालय रिसोड , सचिन गांजरे अध्यक्ष जय लखमा डी.एम.एल.टी. कॉलेज रिसोड ,वृक्षप्रेमी सिमा घळे ईटोलीकर प्रामुख्याने उपस्थित होते.सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते जगत ज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे महत्व विशद करतांना मुलंगे म्हणाले कि,कोणत्याही प्रकारचा कागद किंवा चहाचा कागदी कप रासायनिक पदार्थांशिवाय तयार होत नाहीत.आणि साधारणतः पत्रावळीवर जेवणास कोणत्याही व्यक्तीला अर्धा तास लागतो.त्यामुळे पत्रावळीची जाडी व मजबूती करीता पत्रावळी च्या पृष्ठभागावर विशिष्ट प्रकारच्या मेणाचा थर चढवल्या जातो कि,जो गरम खाद्यपदार्था सोबत वितळून अन्न सेवना सोबत पोटामध्ये शिरून दुर्धर रोगास आमंत्रित करतो असे आरोग्य विभागाशी संबंधित तज्ञांचे मत आहे,याऊलट पळस,मोह,टेंभुर्णी,वड,कमळ इत्यादि वनस्पतींच्या पानातील रस अन्नामध्ये मिसळुन शरिर निरोगी ठेवण्यास मदत करते.दुसरी बाब म्हणजे जेव्हापासून कागदि पत्रावळीचे प्रचलन सुरू झाले तेव्हापासुन अनेक गरिब मजुरांचा रोजगार हिरावल्या गेला.आपण जर छोट्या- मोठ्या कार्यक्रमाकरिता नैसर्गिक पत्रावळीचा उपयोग केला तर अनेक मजुरांना रोजगार तर मिळेलचं याशिवाय अनेक दुर्धर रोगापासून मानवाची मुक्तता होईल,यामध्ये तिळमात्र शंका नाही. ह्या प्रसंगी निसर्ग प्रेमी शंकर थोरात, जनार्धन जहिरव,सौ.कावेरी मुलंगे, टोलुआण्णा यांच्याकडुन तयार करण्यात आलेल्या पळसपान पत्रावळीचे ऊपस्थितामध्ये वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता दिव्या बरडे,विनय बरडे ,श्रावणी बरडे ,श्रध्दा बरडे ,गणेश घोडेकर,गायत्री गांजरे,सोमनाथ काळे ईत्यादिंनी मोलाचे सहकार्य केले.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) I R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

■ हळदीचे भावामुळे शेतकरी समाधानी ■

# रिसोड बाजार समितीत हळदीची आवक वाढली





शेख अन्सारोद्दीन

रिसोड - येथील बाजार समितीमध्ये हळदीने उच्चांक गाठलेला आहे यामुळे हळद हसली असून आज गुरुवार २ मे रोजी हळदीला १६५०० रुपय पर्यंत भाव मिळाला. यामुळे शेतकरी समाधानी दिसत आहे.

यावर्षी सदर भाव हा चांगले असून पुन्हा भाव वाढण्याची आशा पल्लवीत झालेली आहे.

सोयाबीनला पर्यायी पीक म्हणून हळद कडे बघितल्या जात आहेत यामुळे वर्षागणिक हळदीचा पेरा वाढत चाललेला आहे. रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या काही वर्षापासून हळदीची आवक वाढत चाललेली आहे. यामुळे रिसोड बाजार समितीने हळदीची खरेदीसाठी दोन दिवस राखून ठेवलेले आहे.

> गेली पाच सहा वर्षापासून हळद लागवड व हळद काढणी यंत्राची मागणी दुपटीने वाढलेली आहे. हळद लागवडीसाठी शेतकरी आधुनिक यंत्राचा वापर करण्यास अधिक पसंती देत आहेत.
>
> **नवीद खान, कृषी अवजार निर्माता**

आज गुरुवार हळदीच्या दिवशी बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांकडून तब्बल १६५०० पर्यंत कांडी हळद खरेदी केली गेली.तर गट्टू हळदला १५५०० हजार पर्यंतचा भाव शेतकऱ्यांना मिळाला यामुळे हळद उत्पादक शेतकऱ्यांचे अच्छे दिन आल्याचे दिसून येते. रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये वाशिम सह शेजारी जिल्हे हिंगोली,परभणी, जालना, बुलढाणा, अकोला आदी भागातूनही शेतकरी हळद विक्रीसाठी रिसोड कडे येत आहे. यामुळे यामुळे भविष्यात हळदीची मोठी आवक या ठिकाणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

> सद्यस्थितीत बाजारामध्ये तेजी आल्याने हळदीचे भाव वाढलेले आहे.यामुळेच हळदीने सद्यस्थितीत उच्चांक गाठलेला आहे.यामुळे शेतकरी आनंदी असून हळद भावाबद्दल समाधानी आहेत.
>
> **रमेश गायकवाड, अडते**

> हळदीची आवक बघता भविष्यात बाजार समितीमध्ये हळदीची आवक पुन्हा वाढेल असा अंदाज आहे. हळदीसाठी स्वतंत्र व्यवस्था साठी विचार केला जाईल. जेणेकरून शेतकऱ्यांना सोयीचे होईल
>
> **संजय शिंदे**
> **सभापती बाजार समिती**

> हळद उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात अन्य जिल्ह्यातूनही रिसोड बाजार समितीमध्ये आपला माल आणत आहे. बाजार समिती प्रशासन शेतकऱ्यांच्या हिताच्या सुविधेसाठी प्रयत्नशील आहे.
>
> **ए टी कानडे, सचिव**

# साप्ताहिक समता एक्सप्रेस चा प्रकाशन सोहळा संपन्न



रिसोड :- साप्ताहिक समता एक्सप्रेस चा प्रकाशन सोहळा शनिवार दिनांक ४ मे रोजी उत्तमचंदजी बगडिया महाविद्यालय येथील सभागृहामध्ये श्री पुरुषोत्तमजी अग्रवाल यांच्या हस्ते थाटात संपन्न झाला.

प्रकाशन सोहळ्यास ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन मुंबई, चे अध्यक्ष श्री मधुसूदनजी अग्रवाल, माजी खासदार श्री अनंतरावजी देशमुख, संत अमरदास अर्बन को ऑप. सोसायटीचे अध्यक्ष श्री उत्तमचंदजी बगडिया, प्राचार्य कुलकर्णी सर, संजय उकळकर, डॉ. अजय पाटील, नंदकिशोर अग्रवाल, भारतअप्पा जिरवणकर, रामासेठ तोष्णीवाल, रमणसेठ कोठारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना समता फौंडेशनचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी अग्रवाल यांनी बोलतांना साप्ताहिक समता एक्सप्रेसने या भागातील सकारात्मक बातम्या देऊन सुदृढ समाज निर्माण करावा तसेच निपक्ष निर्भिड व समाज उपयोगी बातम्या द्याव्यात अशी अपेक्षा व्यक्त करून साप्ताहिक समता एक्सप्रेसला त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपस्थित सर्व मान्यवरांनी साप्ताहिक समता एक्सप्रेसला भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या. साप्ताहिक समता एक्सप्रेसचे कार्यकारी संपादक अन्सारुद्दीन शेख यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

# निराधार योजनेच्या लाभासाठी तलाठ्यांकडे कागदपत्रांची पुर्तता करा - तहसिलदार तेजनकर



**रिसोड :** शासनाकडुन दिल्या जाणाऱ्या संजय गांधी व श्रावण बाळ निराधार योजनेचा लाभ आता डिबीटी मार्फत दिल्या जाणार आहे. त्यामुळे पात्र लाभार्थींनी १५ जुन पूर्वी आधारकार्ड नंबर व मोबाईल नंबर तहसील कार्यालयात जमा करावेत. असे आवाहन तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी केले आहे.

शासन स्तरावरुन निरांधारांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. दरम्यान, शासन निर्देशानुसार एप्रिल २०२४ पासून संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन योजनेचा लाभ डिबीटी मार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी आधारकार्ड व मोबाईल क्रमांक आवश्यक असून ज्या लाभार्थीचे हे दोन्ही नंबर उपलब्ध नसतील त्यांना अनुदान वितरीत केले जाणार नाही. त्यामुळे पात्र लाभार्थीनी त्यांचे आधारकार्ड नंबर व मोबाईल नंबर गावातील संबंधित तलाठ्यांकडे १५ जून पूर्वी जमा करण्याचे आवाहन तहसीलदार रिसोड यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे. (ता. प्र.)

# पिक कर्जासाठी अडचणी असल्यास तक्रार करण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन



रिसोड := शेतकरी बांधवांना पिक कर्ज घेण्या संदर्भात कुठलीही तक्रार असल्यास जिल्हा प्रशासनाकडून ८६९८३२१९३० आणि ०७२५२ २३५८१३ हे नंबर जाहीर करण्यात आले असून या नंबर वर आपली तक्रार नोंदवा असे आवाहन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकऱ्यांच्या अशाच समस्या लक्षात घेऊन, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून टोल फ्री क्रमांक ८६९८३२१९३० आणि ०७२५२ २३५८१३ जारी करण्यात आला आहे. जो फक्त पीक कर्ज संबंधी समस्या सोडवण्यासाठी असेल. तेव्हा या क्रमांक वर आपली तक्रार नोंदवावी. तक्रार नोंदविताना शेतकऱ्यांनी आपले नाव, phone number, बँकेचे नाव आणि बँकेचे शाखेचे नावाचेही तपशील द्यावे,असे आवाहन जिल्हाधिकारी बुवनेश्वर यांनी केले आहे.

# वृध्द कलावतांची माहीती प्रत्येक पं.स. कडे असली पाहीजे

**रिसोड:** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांमार्फत सन १९५४-५५ पासून वृद्ध साहित्यिक कलाकार मानधन योजना राबविल्या जात असून,सदर योजनेच्या लाभाकरीता,पंचायत समिती कार्यालयामार्फतच अर्ज स्विकारले जातात.शिवाय पंचायत समिती कार्यालया मध्येच,मानधन लाभार्थी वृद्ध कलाकार हे त्यांचे हयात असल्या बाबतचे जीवन प्रमाणपत्र,पासपोर्ट फोटो,आधारकार्ड,बँक खाते क्रमांक आणि मोबाईल नंबर सहा महिन्यांनी देत असतात.व पंचायत समितीमध्ये हयात प्रमाण स्विकारून पुढे जिल्हा परिषद आणि त्यांचे मार्फतच सांस्कृतिक कार्य संचालनालया कडे मुंबईला पाठवीले जातात.त्यामुळे पंचायत समिती कार्यालयात तालुक्यातील १९५४-५५ नंतरच्या सर्व हयात मानधन लाभार्थी कलाकार यांच्या माहितीचे रजिस्टर (रेकॉर्ड) अद्यावत असला पाहिजे. कलावंताचे हयात प्रमाणपत्र मिळाले.कोणाचे मिळाले नाही. कोणते कलाकार मय्यत झाले यांची माहिती व हयात प्रमाणपत्र घेतांना त्या लाभार्थी कलावंताच्या स्वाक्षरीचे रजिस्टर पंचायत समितीने ठेवले पाहिजे.कारण हयात प्रमाणपत्र देऊनही कलावंताची नावे त्रुटीच्या यादीमध्ये कशी काय गेली ? अशी विचारणा आज रोजी लोककलावंताकडून होत आहे. तसेच पंचायत समिती कडे सध्या उपलब्ध असलेली ही यादी जर त्रुटी ची आहे तर ज्यांच्या हयात प्रमाणपत्रा बाबत कोणतीच त्रुटी नाही. अशा लाभार्थी कलावंताची अद्यावत यादी लाभार्थी कलाकाराला का दाखवील्या जात नाही ? (श. प्र.)

